| | |
|---|---|
| MHBI100019172022 | **किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३५१/२०२२** |
| | रावसाहेब सोनवणे व इतर<br>विरुध्द<br>निरंक |

## नि.क्र. १ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार यांनी महाराष्ट्र रेग्युलेशन ॲक्ट VIII, १८२७ मधील कलम २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचे पती मयत निवृत्ती नामदेव सोनवणे हे दिनांक २७.०८.२०२२ रोजी येवता, ता. केज, जि. बीड येथे मयत झाले. ते येवता, ता. केज येथील रहिवासी होते. अर्जदार यांना शासकीय व अशासकीय लाभ घेण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदारांशिवाय मयत निवृत्ती नामदेव सोनवणे यांना अन्य कोणीही वारस नाहीत. मयत निवृत्ती नामदेव सोनवणे यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशिर वारस आहेत हे जाहिर करुन तसा वारस दाखला मिळण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. अभिलेखावरील पुरावा व कागदपत्रांचा विचार करता खालील प्रश्न माझे विचाराधीन आले. त्यावर माझे कारणमिमांसेसह उत्तर खालीलप्रमाणे–

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत का ? : | होकारार्थी. |

२. आदेश कोणता ? : अर्ज मंजूर करण्यात येतो.

**प्रश्न क्र. १ करिताः–**

४. अर्जातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदार क्र. २ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १२ वर दाखल केले आहे. त्यांनी अर्जातील कथने त्यांच्या सरतपासामध्ये नमुद केलेली आहेत. अर्जदारांनी मयत निवृत्ती नामदेव सोनवणे यांचे मृत्यू प्रमाणपत्र (नि.क्र.५), वारस प्रमाणपत्र (नि.क्र.६) व अर्जदार यांच्या आधार कार्डच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. नि.क्र. १३ वर पुरसिस दाखल करुन अर्जदार यांनी पुरावा बंद केला.

५. प्रस्तुत केसमधील जाहिरनामा (नि.क्र.८) ग्राम पंचायत, येवता तसेच तहसिल कार्यालय, केज व या न्यायालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात आला. तसेच प्रकरणाचे जाहिर प्रगटन/जाहिरनामा (नि.क्र.११) दैनिक चंपावतीपत्रच्या अंकात दि. १३.१०.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आले व अर्जदार यांच्या अर्जास हरकत असल्यास या कार्यालयास कळविण्याबाबत कळविण्यात आले. परंतु अद्यापपावेतो कोणतीही हरकत नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांचा लेखी व तोंडी पुरावा आव्हानित झालेला नाही. प्रस्तूत अर्जाच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकांना पुरक असुन तो अबाधित राहिलेला आहे. मृत्यू प्रमाणपत्रावरुन मयत निवृत्ती नामदेव सोनवणे हया मयत असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस असल्याचे दिसून येत असल्यामुळे ते वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, मी प्रश्न क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**प्रश्न क्र. २ करिताः**

६. अर्जदार हे वरीलप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदवलेला आहे. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून प्रश्न क्र. २ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत निवृत्ती नामदेव सोनवणे यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे तरतूदीनुसार दिवाणी नियमावली (Civil Manual) परिच्छेद ३१२ मधील तरतूदींची पुर्तता करुन विहित न्यायालयीन शुल्क जमा केल्यानंतर नियमानुसार देण्यात यावे.

SHEETAL VASANT PAWASKAR
Digitally signed by SHEETAL VASANT PAWASKAR
Date: 2022.11.19 17:09:59 +0530

केज.
दि. १९.११.२०२२

(एस. व्ही. पावसकर)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 19.11.2022

Transcribed on : 19.11.2022

Checked & signed on : 19.11.2022

Sd/-

(P.V. Bhosale),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.